# डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली, ता. दापोली, जिल्हा - रत्नागिरी

## निम्नस्तर कृषि शिक्षण वि भाग

# पदविका प्रवेश माहिती पुस्तिका

## शैक्षणिक वर्ष २०२३-२०२४

### कृषि तंत्र पदविका अभ्यासक्रम

(२ वर्षे कालावधी - मराठी माध्यम)

व

### मत्स्य अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रम

(३ वर्षे कालावधी - इंग्रजी माध्यम)

## प्रवेश प्रक्रिया

**डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली, ता. दापोली, जिल्हा - रत्नागिरी**

**ई-मेल : regr.dbskkv@rediffmail.com**

**संकेतस्थळ : www.dbskkv.org**

.......................................




# डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ दापोली
# ता. दापोली, जिल्हा - रत्नागिरी

| पदाधिकारी | नाव | ई-मेल |
|---|---|---|
| कुलपती व राज्यपाल, महाराष्ट्र राज्य | महामहिम रमेश बैस | - |
| कृषि मंत्री, महाराष्ट्र राज्य, प्रति.कुलपती व अध्यक्ष, महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद, पुणे | मा. अब्दूल सत्तार नाबी | - |
| कुलगुरु | डॉ. संजय दीनानाथ सावंत | vcdbskkv-mh@gov.in |
| अधिष्ठाता (कृषि) | डॉ. बाळकृष्ण गुणाजी देसाई | deandapoli@gmail.com |
| सहयोगी अधिष्ठाता (निकृशि) | डॉ. प्रशांत शंकर बोडके | adlaedbskkv@rediffmail.com |
| कुलसचिव | डॉ. भरत राजाराम साळवी | regr.dbskkkv@gov.in |
| उपकुलसचिव (विद्या) | श्री. सुनिल पंडीत दुसाने | bskkvexamdapoli@rediffmail.com |

# प्रवेश माहिती पुस्तिका २०२३-२४
# पदविका अभ्यासक्रमाचे प्रवेश

## १. प्रस्तावना

१.१ आधुनिक शिक्षणाच्या संकल्पनेनुसार युवक युवतींनी कृषि व्यवस्थापनाबरोबर दैनंदिन जीवनाला कसे सामोरे जावे हे शिक्षण निम्नस्तर कृषि शिक्षण अभ्यासांतर्गत शिकवले जाते. पीक संवर्धन, शेळी पालन, दुग्धव्यवसाय, फलोत्पादन, पशुसंवर्धन, कुक्कुटपालन, मधुमक्षिका पालन, रेशीम उत्पादन, कृषि व्यवस्थापन, विपणन व मत्स्य व्यवसाय प्रशिक्षणाद्वारे व त्याचबरोबर प्रात्यक्षिकाद्वारे व्यवसायाभिमुख शिक्षण या विद्यापीठांतर्गत युवक व युवतींना दिले जाते. या सगळया मार्गदर्शनामुळे विविध कार्याची आखणी कशी करावी, थोड्या वेळात योग्य ती कृती करुन केलेल्या कामाची उद्दिष्टये कशी साध्य करावीत, अशा या सगळया आखणीचा परिणाम काय होतो, हे सगळे अनुभव हे विद्यार्थी या शिक्षणातून घेतात. या विद्यापीठाच्या माध्यमातून योग्य उत्पादन निर्माण करुन त्याच्या विक्री पर्यंतचे सगळे प्रगत तंत्रज्ञान शिकवले जाते आणि त्यामुळे आधुनिक पध्दतीने कृषि क्षेत्रात पारंगतता वाढविण्याचा प्रयत्न केला जातो.

महाराष्ट्र राज्याच्या विशेषत: कोकण विभागाच्या शेतकऱ्यांच्या शेती विषयक अडचणी दूर करणे तथा कृषि क्षेत्राच्या विकासाच्या गरजा लक्षात घेवून महाराष्ट्र शासनाने दिनांक १८ मे, १९७२ रोजी डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठाची दापोली येथे स्थापना केली. या विद्यापीठाचे कार्यक्षेत्र कोकणातील रत्नागिरी, सिंधुदुर्ग, रायगड, ठाणे, पालघर, मुंबई शहर व मुंबई उपनगर या जिल्ह्यांत विस्तारीत आहे.

डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठाचे शिक्षण, संशोधन आणि विस्तार हे तीन महत्वाचे विभाग आहेत. निम्नस्तर कृषि शिक्षण विभाग ही त्यातीलच विद्याशाखा असून या विभागाच्या अंतर्गत १ मत्स्य अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रम, २ घटक अनुदानीत, २ संलग्न अनुदानीत कृषि तंत्र विद्यालये व २३ खाजगी कायम विना अनुदानीत कृषि तंत्र विद्यालये/निकेतने सध्या कार्यरत आहेत. तसेच या विद्यापीठामध्ये ३ माळी प्रशिक्षण केंद्रे असून उद्यानविद्या विभाग कृषि महाविद्यालय दापोली, प्रादेशिक कृषि संशोधन केंद्र, पालघर व प्रादेशिक फळ संशोधन केंद्र, वेंगुर्ला, जिल्हा - सिंधुदुर्ग येथे कार्यरत आहेत. कृषि तंत्र विद्यालय/निकेतनांची यादी माहिती पुस्तिकेत देण्यात आलेली आहे.

१.२ राज्यातील चारही कृषि विद्यापीठातील पदविका अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रिया यापूर्वी सन २०१७-१८ पर्यंत महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद, पुणे यांच्या स्तरावर राबविण्यात येत होती. परंतू महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषदेच्या ९८ व्या बैठकीमध्ये कृषि व पदुम विभाग, शासन निर्णय दिनांक.३०/५/२०१८ मधील सूचना विचारात घेऊन पारीत केलेल्या ठराव क्र.०४/९८/२०१९ नुसार पदविका अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रिया २०१९-२० या शैक्षणिक वर्षापासून संबंधित कृषि विद्यापीठ स्तरावर राबविण्यास कृषि परिषदेने मान्यता प्रदान केली आहे .

१.३ कृषि तंत्रज्ञान पदविका अभ्यासक्रम बंद झाल्याने कृषी परिषदेच्या ९६ व्या बैठकीतील ठराव क्र.०२/९६/२०१८ अनुसार खालील बाबी प्रवेशोच्छुकांच्या निदर्शनास आणण्यात येत आहेत.

सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षा पासून कृषि तंत्र पदविका (२ वर्षे कालावधीचा मराठी माध्यम) अभ्यासक्रमाच्या पहिल्या वर्षात प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना कृषि तंत्रनिकेतन पदविका (३ वर्षे कालावधीचा अर्ध इंग्रजी माध्यम) अभ्यासक्रम बंद झाल्याने थेट तिसऱ्या वर्षात सन २०२३-२४ या शैक्षणिक वर्षामध्ये प्रवेश मिळणार नाही.

## १.४ कृषि विद्यापीठाचे कार्यक्षेत्र

| अ.क्र | कृषि विद्यापीठाचे नांव | कार्यक्षेत्रांतर्गत जिल्हे |
|---|---|---|
| १ | डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ दापोली, ४१५ ७१२<br>जिल्हा. रत्नागिरी (महाराष्ट्र) | रत्नागिरी, सिंधुदुर्ग, रायगड, ठाणे, पालघर<br>मुंबई शहर व मुंबई उपनगर |

## १.५ पदविका अभ्यासक्रम, कालावधी आणि पात्रता

| अ. क्र. | अभ्यासक्रम | कालावधी | पात्रता |
|---|---|---|---|
| १. | कृषि तंत्र पदविका (मराठी माध्यम) | २ वर्षे | उमेदवार महाराष्ट्रातील माध्यमिक व उच्च माध्यमिक शालांत परीक्षा मंडळाची माध्यमिक शालांत परीक्षा (इ.१० वी) किंवा समकक्ष परीक्षा उत्तीर्ण . |
| २. | मत्स्य अभियांत्रिकी पदविका (Fisheries Engineering Dilploma) (इंग्रजी माध्यम) | ३ वर्षे | |

## २. डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली, अंतर्गत कार्यरत असलेली कृषि तंत्र विद्यालय/निकेतने

### २.१ घटक व संलग्न अनुदानित कृषि तंत्र विद्यालये

| अ. क्र. | विद्यालयाच्या विकल्पाचे सांकेतिक क्र. | कृषि तंत्र विद्यालयांचे व प्राचार्यांचे नांव | प्रवेश क्षमता | दुरध्वनी /भ्रमणध्वनी क्रमांक | ई-मेल | ज्या जिल्ह्यांशी मर्यादित आहे त्या जिल्ह्यांचे नांव |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २१४१०३ | प्राचार्य, डॉ. सी. एस. कदम,<br>कृषि तंत्र विद्यालय, रोहा, जि. रायगड (घटक) | ६० | ९७३०२५५५१०<br>९४०४६५५२६४ | atsroha1959@rediffmail.com<br>atsroha1959@gmail.com | रायगड |
| २ | २१५१०२ | डॉ. उमेश कुरतडकर<br>प्राचार्य, कृषि तंत्र विद्यालय, लांजा<br>४१६ ७१२ (घटक) | रत्नागिरी - ३०<br>सिंधुदुर्ग - ३० | (०२३५१)<br>२३००४२ | atslanja@rediffmail.com<br>atslanja@gmail.com | रत्नागिरी<br>सिंधुदुर्ग |
| ३ | २१३१०४ | प्राचार्य, श्री. प्रसाद लवू कासले,<br>कृषि तंत्र विद्यालय, कोसबाडहिल, ता. डहाणू,<br>जि. पालघर ४०१ ७०३ (संलग्न). | ५० | ९२७००३८६१७<br>९७६५८७२३४१ | agrikosbad@rediffmail.com<br>agrikosbad@gmail.com | ठाणे, पालघर, मुंबई शहर व मुंबई उपनगर |
| ४ | २१३१०५ | प्राचार्य, श्री. प्रसाद लवू कासले,<br>महात्मा गांधी आदिवासी जनता कृषि तंत्र विद्यालय,<br>कोसबाडहिल, ता. डहाणू,<br>जि. पालघर ४०१ ७०३ (संलग्न) | ५० | ९२७००३८६१७<br>९९६०८०८२८०<br>८८३०७२४४९४ | mgajvkosbad@gmail.com | खालील टिप प्रमाणे |

**टिप :**

**महात्मा गांधी आदिवासी जनता कृषि तंत्र विद्यालय, कोसबाडहिल, ता. डहाणू या विद्यालयात ठाणे, पालघर, रायगड, नाशिक, धुळे, नंदुरबार व अहमदनगर जिल्ह्यातील फक्त आदिवासी उमेदवारांनीच अर्ज भरावे कारण आदिवासी उमेदवारांकरीता कंसात दर्शविल्या प्रमाणे जिल्हानिहाय जागा राखून ठेवण्यात आल्या आहेत. रायगड (८), नाशिक (८), धुळे (८), नंदुरबार (८), अहमदनगर (८), ठाणे (५) आणि पालघर (५),**

## २.२ कायमस्वरुपी विना अनुदानित कृषि तंत्र विद्यालये / कृषि तंत्र निकेतने

| अ. क्र. | विद्यालय/ निकेतनाच्या विकल्पाचे सांकेतिक क्र | कृषि तंत्र विद्यालय/निकेतनांचे व प्राचार्यांचे नांव | दुरध्वनी / भ्रमणध्वनी क्रमांक | ई.मेल | ज्या जिल्ह्यांशी मर्यादित आहे त्या जिल्ह्यांचे नांव | प्रवेश क्षमता<br>कृषि तंत्र पदविका प्रथम वर्ष<br>२ वर्ष कालावधी (मराठी माध्यम) |
|---|---|---|---|---|---|---|
| **जिल्हा - ठाणे, मुंबई शहर व मुंबई उपनगर** | | | | | | |
| १ | २१३१०६ | प्राचार्य, श्री. एन. के. राऊत,<br>कृषि तंत्र विद्यालय, सरळगांव, ता.मुरबाड,<br>जिल्हा - ठाणे ४२१ ४०१. | (०२५२४)२४०७७०<br>८५५४९४३३३७ | agripolytechnicsaralagon@<br>rediffmail.com | ठाणे | ६० |
| २ | २१३१०८ | प्राचार्य, श्री. प्रकाश पांडुरंग भांगरथ<br>श्री तिसाई कृषि तंत्र विद्यालय, लेनाड, बु.//<br>ता.- शहापूर, जिल्हा - ठाणे. | ९४२३०२६६००<br>८६०५४७६६०० | stktn.lenad@rediffmail.com | ठाणे | ६० |
| ३ | २१३११२ | प्राचार्या, श्रीमती निलाक्षी मंदार शिंदे<br>मंदार कृषि तंत्र विद्यालय, कोळींब,<br>ता. कल्याण, जिल्हा - ठाणे ४२१ ३०१. | (०२५१)२९७४१२९<br>९५९४९०८१४४<br>९८८१५००२१२ | mktvkolimb@rediffmail.com<br>mktvkolimb@gmail.com | ठाणे | ६० |
| ४ | २१३११४ | प्राचार्य, श्री. मिलींद रमेश घरत<br>कृषि तंत्र विद्यालय, खानिवली, पो. वासिंद,<br>ता. भिवंडी, जिल्हा -ठाणे ४२१ ६०१ | ९२२४३४१८८३<br>९८१९६८३३०३ | kvkhaniwali@rediffmail.com | ठाणे | ६० |
| ५ | २१३१०९ | प्राचार्या, श्रीमती. अनघा कुं. मांडवकर,<br>केशवसृष्टी कृषि तंत्र विद्यालय, उत्तन, भाईंदर (प.),<br>जिल्हा - ठाणे ४०१ १०६ | (०२२)२८४५१२२५<br>९९२००७८४८४ | principal@ukss.org | ठाणे | ६० |
| | | | | | | |

| अ. क्र. | विद्यालय/ निकेतनाच्या विकल्पाचे सांकेतिक क्र | कृषि तंत्र विद्यालय/निकेतनांचे व प्राचार्यांचे नांव | दुरध्वनी / भ्रमणध्वनी क्रमांक | ई.मेल | ज्या जिल्ह्यांशी मर्यादित आहे त्या जिल्ह्यांचे नांव | प्रवेश क्षमता कृषि तंत्र पदविका प्रथम वर्ष २ वर्ष कालावधी (मराठी माध्यम) |
|---|---|---|---|---|---|---|
| **जिल्हा - पालघर** | | | | | | |
| ६ | २१३११३ | प्राचार्य, श्रीमती. सोनालीका अ. पाटील<br>कृषि तंत्र विद्यालय, आसनगांव, ता. डहाणू,<br>जिल्हा -पालघर ४०१ १०३. | ७८७५९७७०१९<br>९२७००२४२४२ | apta2012@rediffmail.com | पालघर | ६० |
| ७ | २१३३७० | प्राचार्या, श्रीमती. तेजल दिवाकर पाटील,<br>कृषि तंत्र विद्यालय, विरेवाडी, पो. गोवणे, ता.डहाणू,<br>जिल्हा -पालघर ४०१ १०३ | ७०६६७०५८९२<br>९६३७२८१२३८ | ktnvangaon@rediffmail.com | पालघर | ६० |
| **जिल्हा - रायगड** | | | | | | |
| ८ | २१४३५९ | प्राचार्य, श्री. विशाल बैरागी,<br>कृषि तंत्र विद्यालय, गालसुरे, ता. श्रीवर्धन,<br>जिल्हा - रायगड ४०२ ११० | ९१३०५८८४७० | raiagripolygalsure@rediffmail.com,<br>rktvgalsure@rediffmail.com | रायगड | ६० |
| ९ | २१४३५४ | प्राचार्य, श्री. जगन्नाथ मोरे<br>कृषि तंत्र विद्यालय, नांदगांव खुर्द, पो. तळोशी,<br>ता. महाड, जिल्हा - रायगड. | ९८५०४३३०४७ | krishinandgaon@rediffmail.com | रायगड | ६० |
| १० | २१४११७ | प्राचार्य, श्री. एस. जी. पोखरकर,<br>चं. रं. म्हसे कृषि तंत्र विद्यालय, वारे,<br>पो. कळंब, ता. कर्जत , जिल्हा - रायगड ४१० १०१ | ९२०९१९६३९८<br>८८०५२०३३९८ | pcrmktnware@rediffmail.com | रायगड | ६० |
| ११ | २१४११८ | प्राचार्य, श्री. आर. एस. पोरे<br>मोतीराम जगताप कृषि तंत्र विद्यालय, कोकरे, तर्फे नाते,<br>पो. आचळोली, ता. महाड, जिल्हा - रायगड | ७३५०४५९९९९<br>८७९३४००८३५ | mjkokare@rediffmail.com | रायगड | ६० |

| अ. क्र. | विद्यालय/ निकेतनाच्या विकल्पाचे सांकेतिक क्र | कृषि तंत्र विद्यालय/निकेतनांचे व प्राचार्यांचे नांव | दुरध्वनी / भ्रमणध्वनी क्रमांक | ई.मेल | ज्या जिल्ह्यांशी मर्यादित आहे त्या जिल्ह्यांचे नांव | प्रवेश क्षमता कृषि तंत्र पदविका प्रथम वर्ष २ वर्ष कालावधी (मराठी माध्यम) |
|---|---|---|---|---|---|---|
| १२ | २१४३५८ | श्री. संजय एम्. हिरेमठ,<br>प्राचार्य, कृषि तंत्र विद्यालय, सांगुर्ली ता. पनवेल,<br>जिल्हा - रायगड. | ९८६७४९८१६१<br>९५२९३६२८९४<br>९९७५३०५१२३ | Ktns151@rediffmail.com | रायगड | ६० |
| जिल्हा – रत्नागिरी | | | | | | |
| १३ | २१५११९ | प्राचार्या, श्रीमती हर्षदा माने,<br>कृषि तंत्र विद्यालय, सुकीवली, ता.खेड,<br>जिल्हा - रत्नागिरी. | ७८२२९५५८५० | ktvsukivali.khed@rediffmail.com | रत्नागिरी | ६० |
| १४ | २१५३६० | प्राचार्य, श्री. संभाजी बाळकृष्ण गायकवाड<br>कृषि तंत्र विद्यालय, खवटी, ता.खेड,<br>जिल्हा -रत्नागिरी ४१५ ६४०. | ९६२३०४४००२ | ktnvkhavati@rediffmail.com | रत्नागिरी | ६० |
| १५ | २१५१२२ | प्राचार्य, श्री. सावंत विकास जयराम,<br>द.ग. तटकरे, कृषि तंत्र विद्यालय, खरवते-दहिवली,<br>ता. चिपळूण, जि. रत्नागिरी. | ९६६५५०५९९८<br>९६२३९१६१३२ | dgtatakarepoly@rediffmail.com<br>dgtatakarepoly2014@gmail.com | रत्नागिरी | ६० |
| १६ | २१५१२८ | प्राचार्य, श्री. प्रसन्न दिलीप भाटकर<br>प्रा. मधु दंडवते कृषि तंत्र विद्यालय, देवरुख (मातृमंदिर)<br>ता. संगमेश्वर, जिल्हा -रत्नागिरी ४१५ ८०४ | ९९७५८४२७५६ | pmdagripolytech@<br>rediffmail.com | रत्नागिरी | ६० |
| १७ | २१५१२३ | श्री. विकास शेटये,<br>प्राचार्य, ए.बी. कृषि तंत्र विद्यालय, शिरगांव<br>ता. मंडणगड, जिल्हा - रत्नागिरी. | ९५७९२२३८७४ | shetyevikas21@gmail.com<br>avigoriwale52@gmail.com | रत्नागिरी | ६० |

| अ. क्र. | विद्यालय/ निकेतनाच्या विकल्पाचे सांकेतिक क्र | कृषि तंत्र विद्यालय/निकेतनांचे व प्राचार्यांचे नांव | दुरध्वनी / भ्रमणध्वनी क्रमांक | ई.मेल | ज्या जिल्ह्यांशी मर्यादित आहे त्या जिल्ह्यांचे नांव | प्रवेश क्षमता कृषि तंत्र पदविका प्रथम वर्ष २ वर्ष कालावधी (मराठी माध्यम) |
|---|---|---|---|---|---|---|
| **जिल्हा -सिंधुदुर्ग** | | | | | | |
| १८ | २१६३५६ | **प्राचार्य, श्री. समिर भिकाजी कोलते**<br>**कृषि तंत्र विद्यालय, पाडलोस, पो. मडुरा, ता. सावंतवाडी, जिल्हा -सिंधुदुर्ग ४१६ ५१४** | ९४२२५९६४३४<br>९८२३३१८११३<br>९४२३३०४४०६ | padlos_agritech@rediffmail.com | सिंधुदुर्ग | ६० |
| १९ | २१६१३० | **प्राचार्य, श्रीमती. जागृती संदीप पाटील**<br>**कृषि तंत्र विद्यालय, सांगुळवाडी,**<br>**ता. वैभववाडी, जिल्हा -सिंधुदुर्ग ४१६ ८१०** | (०२३६७)२३७३७०/<br>२३७४७०,<br>९४०३३९४१७४ | Jagrutipatil1207@gmail.com | सिंधुदुर्ग | ६० |
| २० | २१६१९४ | **प्राचार्य, श्री. संजय दत्ताराम सावंत**<br>**कृषि तंत्र विद्यालय, माडखोल, ता.सावंतवाडी, जि.सिधुदुर्ग ४१६ ५१०** | ९४२२४९२७७३<br>८७८८१७१८७२ | madkhol_krishividyalay32@<br>rediffmail.com | सिंधुदुर्ग | ६० |
| २१ | २१६३५५ | **प्राचार्य, श्री. परेश भद्रसेन परब**<br>**कृषि तंत्र विद्यालय, वळीवंडे, ता.देवगड,**<br>**जिल्हा -सिंधुदुर्ग.** | ९४२१२६८३९५<br>९४२२३७९९१६ | waliwande_agripolytech@<br>rediffmail.com | सिंधुदुर्ग | ६० |
| २२ | २१६१३२ | **प्राचार्य, श्री. पंकज रामचंद्र संते,**<br>**श्रीमती सुमती मराठे कृषि तंत्र विद्यालय, फोंडाघाट, औद्योगिक प्रशिक्षण संस्थेजवळ,**<br>**ता. कणकवली, जिल्हा -सिंधुदुर्ग ४१६ ६०१.** | ८२०८८६२४३२ | ssmktv@rediffmail.com | सिंधुदुर्ग | ६० |

| अ. क्र. | विद्यालय/ निकेतनाच्या विकल्पाचे सांकेतिक क्र | कृषि तंत्र विद्यालय/निकेतनांचे व प्राचार्यांचे नांव | दुरध्वनी / भ्रमणध्वनी क्रमांक | ई.मेल | ज्या जिल्ह्यांशी मर्यादित आहे त्या जिल्ह्यांचे नांव | प्रवेश क्षमता |
|---|---|---|---|---|---|---|
| **जिल्हा -सिंधुदुर्ग** | | | | | | |
| २३ | २१६३६६ | प्राचार्या, श्रीमती. गौरी श्रीधर मुसळे<br>कृषि तंत्र विद्यालय, हरकुळ बुद्रुक,<br>ता. कणकवली, जिल्हा - सिंधुदुर्ग ४१६ ६०२ | ९०९६९५१६५१ | sspmagrikankavali@gmail.com<br>sspmagrikankavli@rediffmail.com | सिंधुदुर्ग | ६० |

## २.३. मत्स्य अभियांत्रिकी पदविका (३ वर्षे इंग्रजी माध्यम)

| अ. क्र. | विद्यालयाच्या विकल्पाचे सांकेतिक क्रमांक | विद्यालयांचे व प्राचार्यांचे नांव | प्रवेश क्षमता | दूरध्वनी /भ्रमणध्वनी क्रमांक | ई.मेल |
|---|---|---|---|---|---|
| जिल्हा -रत्नागिरी | | | | | |
| १. | १४१०१ | प्राचार्य, डॉ. आशिष सुरेश मोहिते<br>मत्स्य अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रम विद्यालय, शिरगांव<br>जि. रत्नागिरी. ४१५ ६२९ | ३० | ९४०४१५८८०८ | dfertg2011@gmail.com |

## ३. कृषि तंत्र पदविका (२ वर्षे कालावधी मराठी माध्यम)

### ३.१ उद्देश :-

शेतकरी व शेत मजुरांच्या मुलांना कृषि व तत्सम विषयांचे प्रात्यक्षिकाभिमुख शिक्षण देऊन त्यांचा आत्मविश्वास वाढविणे त्यामुळे विद्यार्थी स्वतःची शेती करण्यास प्रवृत्त होऊन सुधारीत तंत्रज्ञानाच्या वापरामुळे कृषि उत्पादन वाढेल.

कृषि तंत्र पदविका धारकास कृषि पूरक स्वयंरोजगाराभिमुख उद्योगाद्वारे स्वतःच्या रोजगाराची निर्मिती करुन स्वावलंबी होता येईल व त्याद्वारे इतरांना देखील रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील. कृषि पदविका धारक इतर शेतकऱ्यांना मार्गदर्शक म्हणून कार्य करतील. कृषि पदविका धारकास "कृषि सहाय्यक" म्हणून शासकीय अथवा खाजगी क्षेत्रात सेवा करता येईल.

३.२ कृषि तंत्र पदविका अभ्यासक्रम शैक्षणिक कालावधी व सूचना

३.२.१ कृषि तंत्र पदविका हा २ वर्षीय मराठी माध्यमातील पूर्ण वेळ अभ्यासक्रम आहे.

३.२.२ उमेदवार हा महाराष्ट्र राज्यातील विभागातील रहिवाशी असावा.

३.२.३ विद्यार्थ्यांना प्रवेश रहिवाशी जिल्हानिहाय दिला जाईल.

### ३.३ शैक्षणिक पात्रता

या अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेऊ इच्छिणारा उमेदवार माध्यमिक व उच्च माध्यमिक शालांत परीक्षा मंडळाची माध्यमिक शालांत परीक्षा (एस.एस.सी./१० वी) किंवा समकक्ष परीक्षा उत्तीर्ण झालेला असावा.

## ४. मत्स्य अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रम (३ वर्ष इंग्रजी माध्यम)

महाराष्ट्र शासन निर्णय क्रमांक को.कृ.वि.२०१०/प्र.क्र.१०१/७ ए/दिनांक ६/८/२०१० नुसार डॉ.बाळासाहेब कोकण कृषि विद्यापीठ, दापोली अंतर्गत शिरगाव, जि. रत्नागिरी येथे ३ वर्षाचा मत्स्य अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रम सुरु करण्यात आलेला आहे.

## ४.१ उद्देश

मत्स्य अभियांत्रिकी पदविका या अभ्यासक्रमाची आखणी ही मुख्यतः स्वयंरोजगार निर्मितीचे उद्दिष्ट समोर ठेवून करण्यात आलेली आहे. मत्स्य अभियांत्रिकी शास्त्रातील उत्तम दर्जा प्राप्त होण्याइतका विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास वाढवणे. मत्स्य उत्पादना नंतर मासळीची आणि मासळीच्या पदार्थाची गुणवत्ता उत्तम ठेवणे आणि राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवरील स्पर्धात्मक क्षेत्रात टिकून राहण्यासाठी येणाऱ्या व्यवसायांच्या आव्हानांची यशस्वीरित्या पूर्तता करण्यासाठी सक्षम मनुष्यबळ निर्माण करणे हे प्रमुख उद्देश या पदविका प्रशिक्षणात अंर्तभूत आहेत.

भारताला विविध प्रकारची समुद्रीय परिस्थिती निसर्गाने उपलब्ध करुन दिली आहे. म्हणून अनेक प्रकारची मासळी आपल्या देशात मिळते. बराचसा मत्स्य माल व्यापारी बाहेरच्या देशात निर्यात करू लागले आहेत. यात गोठविलेली कोळंबी, मासे आणि इतर मत्स्य पदार्थांची निर्यात मोठया प्रमाणावर होत आहे. तरी अशा प्रकारच्या मत्स्य निर्यातीस अजूनही खूप मोठा वाव आहे. त्याकरीता निर्यात योग्य मत्स्य माल तयार करण्यासाठी निरनिराळया यंत्राचा वापर करावा लागतो. त्या दृष्टीने त्या क्षेत्रातील तंत्रज्ञ तयार करण्यासाठी मत्स्य अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रम स्थापणे आवश्यक झाले आहे. प्रशिक्षित मनुष्यबळ हे उपनिर्दिष्ट निर्यात योग्य मालाचे उत्पादन सक्षमपणे करेल, हे उद्दिष्ट विचारात घेऊन मत्स्य अभियांत्रिकी पदविका हा अभ्यासक्रम महाराष्ट्र शासनाने मंजूर केला आहे.

आज मत्स्य व्यवसाय क्षेत्रात जे असंघटित मनुष्यबळ या व्यवसायाची तांत्रिक बाजू सांभाळत आहेत ते बहुतांशी लोक याबाबीचे प्रशिक्षण न घेतलेले आहेत. पारंपारिकरित्या या व्यवसायात अनेक वर्ष कार्यरत राहिल्याने अनुभवाच्या बळावर मिळालेल्या ज्ञानाच्या आधाराने हे लोक या व्यवसायाची तांत्रिक बाजू सांभाळत आहेत. यासाठी त्यांनी कित्येक वर्ष या क्षेत्रात काम करुन हा अनुभव मिळवला आहे. या पार्श्वभूमिचा आणि त्यासाठी दिल्या जाणाऱ्या कार्यकालाचा विचार करता, योग्य अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रमामुळे तांत्रिकदृष्ट्याा ''कुशल'' असे मनुष्यबळ मत्स्य व्यवसायांस मिळवून देणे शक्य होणार आहे. योग्य शिक्षण मिळाल्याने या संघटित मनुष्यबळातून मत्स्य व्यवसायाच्या मत्स्य अभियांत्रिकी मधील विविध क्षेत्रासाठी तंत्रज्ञ तर मिळतीलच त्याशिवाय स्वयंरोजगाराच्या माध्यमातूनही अर्थाजनासोबतच रोजगाराच्या संधीही उपलब्ध होणार आहेत. या अभ्यासक्रमांतर्गत मासेमारी नौका बांधणी, नौका उपकरणे दुरुस्ती व देखभाल, मत्स्य शेतीसाठी तलाव बांधणे इ. मत्स्य अभियांत्रिकी विषयाशी निगडीत आवश्यक उपविषयांच्या प्रशिक्षणाचा अंतर्भाव आहे. हा अभ्यासक्रम अभ्यासत असताना विद्यार्थी त्यांच्या आवडीनुसार पुढील ४ विषयांपैकी एका विषयाचे सम्यक ज्ञान व प्रत्यक्ष क्षेत्रातील एका वर्षाचा अनुभव आत्मसात करुन पदविका अभ्यासक्रम पूर्ण करतील.

अ. मत्स्य अभियांत्रिकी पदविका (मासेमारी नौका बांधणी व मरीन इंजिन)
ब. मत्स्य अभियांत्रिकी पदविका (मासेमारी तंत्रज्ञान)
क. मत्स्य अभियांत्रिकी पदविका (मत्स्य प्रक्रिया आणि शीतकीकरण यंत्रसामुग्री)
ड. मत्स्य अभियांत्रिकी पदविका (मत्स्य संवर्धन अभियांत्रिकी)

**मत्स्य अभियांत्रिकी पदविका हा तीन वर्षाचा पदविका अभ्यासक्रम पूर्ण केलेले यशस्वी विद्यार्थी / विद्यार्थीनी बॅचलर ऑफ फिशरीज सायन्स ( बी. एफ. एस् सी .) या पदवी अभ्यासक्रमाच्या थेट व्दितीय वर्षात गुणवत्तेनुसार मर्यादित संख्येच्या प्रमाणात प्रवेशाकरिता पात्र राहतील.**

## ४.२ शैक्षणिक कालावधी

**मत्स्य अभियांत्रिकी पदविका हा तीन वर्षीय इंग्रजी माध्यमातील पूर्णवेळ अभ्यासक्रम आहे.**

## ४.३ शैक्षणिक पात्रता

**मत्स्य अभियांत्रिकी पदविका या अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेवू इच्छिणारा उमेदवार माध्यमिक व उच्च माध्यमिक शालांत परीक्षा मंडळाची माध्यमिक शालांत परीक्षा (एस.एस.सी./१०वी) किंवा समकक्ष परीक्षा उत्तीर्ण झालेला असावा.**

## ४.४ व्याख्या (मत्स्य अभियांत्रिकी पदविका प्रवेशाबाबत)

### ४.४.१ विद्यापीठ कोटा ("U" Quata)

**ज्या उमेदवारांकडे महाराष्ट्राचे अधिवास प्रमाणपत्र आहे किंवा ज्या उमेदवारांच्या विद्यालय सोडल्याच्या दाखल्यावर महाराष्ट्र राज्यातील जन्म ठिकाण आहे किंवा महाराष्ट्र राज्यातील सक्षम प्रधिकाऱ्यांकडील जन्म दाखला आहे आणि संबंधित कृषि विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील संस्थेतून माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण आहे अशा उमेदवारांसाठी राखून ठेवलेल्या जागांना विद्यापीठ कोटा ("U"Quata) असे संबोधण्यात येते. विद्यापीठ कोट्यासाठी एकूण प्रवेश क्षमतेच्या ७० टक्के जागा उपलब्ध असतील.**

### ४.४.२. महाराष्ट्र कोटा ("M" Quata)

**ज्या उमेदवारांकडे महाराष्ट्राचे अधिवास प्रमाणपत्र आहे किंवा ज्या उमेदवारांच्या विद्यालय सोडल्याच्या दाखल्यावर महाराष्ट्र राज्यातील जन्म ठिकाण आहे किंवा महाराष्ट्र राज्यातील सक्षम प्रधिकाऱ्यांकडील जन्म दाखला आहे. अशा उमेदवारांसाठी राखून ठेवलेल्या जागांना महाराष्ट्र कोटा** ("M" Quata) **असे संबोधण्यात येते. महाराष्ट्र कोट्यासाठी एकूण प्रवेश क्षमतेच्या ३० टक्के जागा उपलब्ध असतील. विद्यापीठ कोट्यातील उमेदवार महाराष्ट्र कोट्याकरीता सुध्दा पात्र आहेत.**

## ५. कृषि तंत्र पदविका प्रथम वर्ष (२ वर्ष कालावधी) व मत्स्य अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रम (३ वर्ष कालावधी) प्रथम वर्षासाठी प्रवेश अर्ज भरण्याबाबत उमेदवारांसाठी सूचना.

५.१. प्रवेश देण्याबाबतची सूचना प्रसिध्द झाल्यापासून विद्यापीठाच्या संकेतस्थळ www.dbskkv.org वर दिनांक २५/०५/२०२३ पासून प्रवेश माहिती पुस्तिका व प्रवेश अर्जाचा नमुना उपलब्ध करुन देण्यात येईल. प्रवेश पात्र उमेदवाराने शैक्षणिक पात्रतेनुसार प्रवेश अर्ज भरावा. प्रत्येक पदविका अभ्यासक्रमांसाठी वेगळा अर्ज सादर करावा (उदा. कृषि तंत्र पदविका व मत्स्य अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रमांसाठी वेगवेगळा अर्ज सादर करण्यात यावा).

५.२. प्रवेश अर्जाची प्रत व प्रवेश माहिती पुस्तिका विद्यापीठाचे संकेतस्थळ www.dbskkv.org वर Admission या टॅब वर Click करुन Diploma Admission 2023-24 या फाईल मधून डाऊनलोड करुन A4 साईज पेपर वर प्रिंट काढावी. अर्ज व अर्जासोबत भरावयाचे प्रपत्र भरण्यापूर्वी विद्यार्थ्याने प्रवेश माहिती पुस्तिका व प्रवेश अर्ज काळजीपूर्वक वाचावे.

५.३. प्रवेश अर्जातील तपशिल उमेदवाराने पूर्ण सत्य व अचूक भरावा. उमेदवाराने संपूर्ण प्रवेश अर्ज स्वतःच्या हस्ताक्षरामध्ये भरावा व सर्व संबंधित प्रमाणपत्रांच्या साक्षांकीत/स्वसाक्षांकीत केलेल्या छायांकीत प्रतीसह व प्रवेश अर्ज शुल्कासह प्रवेश घेवू इच्छिणाऱ्या कृषि तंत्र विद्यालय व मत्स्य अभियांत्रिकी विद्यालयातच (या माहिती पुस्तिकेतील पृ.क्र. ५ ते ९ वर दर्शविण्यात आलेली विद्यालये) विहीत प्रवेश अर्ज शुल्क भरुन स्वतः उपस्थित राहून अर्ज सादर करावा. पोस्टाने अर्ज सादर करताना ज्या विद्यालयांत अर्ज सादर करावयाचा आहे त्या विद्यालयांच्या प्राचार्यांशी भ्रमणध्वनी / दूरध्वनीव्दारे संपर्क साधून अर्ज सादर करणेबाबत योग्य सूचनांचे पालन करणे अनिवार्य आहे. (कागदपत्रांच्या स्वसाक्षांकीत केलेल्या छायांकीत प्रतींबाबत प्रमाणपत्र 'परिशिष्ट - सी' सादर करणे अनिवार्य आहे).

५.४. पोस्टाने अर्ज विहित मुदतीध्ये प्राप्त न झाल्यास सर्वस्वी जबाबदारी संबंधित विद्यार्थ्याची राहील.

५.५. अर्ज जमा केल्यानंतर सदर अर्जावर विद्यालयामार्फत प्रवेश अर्ज क्रमांक देण्यात येईल व अर्जासोबत असलेली पोहोच विद्यार्थ्यांना अर्ज क्रमांकासह परत देण्यात येईल. (प्रत्यक्ष विद्यालयात येवून प्रवेश अर्ज सादर केलेल्या विद्यार्थ्यांनाच पोहोच देण्यात येईल).

५.६. खुल्या प्रवर्गातील उमेदवारांसाठी रु. ४००/- तर आरक्षित प्रवर्गातील उमेदवारांसाठी रु.२००/- प्रवेश अर्ज शुल्क आहे. सदरचे शुल्क रोखीने अथवा डीडीने प्राचार्य, कृषि तंत्र विद्यालय/मत्स्य अभियांत्रिकी पदविका विद्यालय यांचे कार्यालयात प्रवेश अर्जासह अदा करणे बंधनकारक आहे. (डीडी ने शुल्क भरावयाचे असल्यास - ''नियंत्रक, डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली'' यांचे नांवे दापोली येथे देय असलेला डीडी सादर करावा) सदरचे शुल्क ना परतावा आहे.

संबंधित एकत्रित रक्कम विद्यालय/मत्स्य अभियांत्रिकी पदविका विद्यालय यांनी तात्काळ डीडी किंवा RTGS/NEFT द्वारे विद्यापीठाकडे जमा करावी.

५.७. मत्स्य अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रमासाठी प्रथम वर्षात प्रवेश घेणाऱ्या उमेदवारांचे वय अर्ज सादर करावयाच्या अंतिम तारखेस १५ ते ३० वर्षाचे दरम्यान असले पाहिजे व उमेदवार माजी सैनिक असल्यास त्यांचे वय ४५ पेक्षा जास्त नसावे.

कृषि तंत्र पदविका अभ्यासक्रमासाठी प्रथम वर्षात प्रवेश घेणाऱ्या उमेदवारांचे वय अर्ज सादर करावयाच्या अंतिम तारखेस खुला प्रवर्गासाठी १५ ते ३८ वर्षाचे दरम्यान असले पाहिजे, इतर उमेदवारांचे वय १५ ते ४३ वर्षाचे दरम्यान असले पाहिजे व माजी सैनिक उमेदवार असल्यास त्यांचे वय ४५ पेक्षा जास्त नसावे.

५.८. उमेदवाराने अर्जासोबत खाली दर्शविलेल्या कागदपत्रांच्या छायांकीत प्रती साक्षांकीत / स्वसाक्षांकीत करून प्रवेश अर्जासोबत सादर कराव्यात व अंतिम प्रवेशाच्यावेळी सदर कागदपत्रांच्या मुळ प्रती संबंधित विद्यालयात सादर करुन आपला प्रवेश निश्चित करावा.

अ. इयत्ता १० वी किंवा समकक्ष परीक्षा उत्तीर्ण गुणपत्रक (प्रमाणपत्र) (उमेदवार १०वी मध्ये अधिक प्रयत्नांत उत्तीर्ण असल्यास सर्व गुणपत्रके).

ब. विद्यालयाचा/शाळा सोडल्याचा दाखला ज्या विद्यालयातून शेवटची परीक्षा उत्तीर्ण आहे त्या विद्यालयाचा शाळा सोडल्याचा मूळ दाखला किंवा उमेदवाराने इतर अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतला असेल तर त्या विद्यालयाचे/महाविद्यालयाचे बोनाफाईड (Bonafide certificate). परंतु एकदा प्रवेश घेतल्यानंतर उमेदवाराने ७ दिवसांच्या आत शाळा सोडल्याचा दाखला जेथे प्रवेश घेतला आहे तेथे सादर करणे बंधनकारक आहे. अन्यथा त्याचा प्रवेश रद्द होऊ शकतो. तसेच ज्या उमेदवाराचा इयत्ता १० वी किंवा या नंतर काही कारणाने शैक्षणिक खंड पडला असेल तर त्या उमेदवारांनी त्यासंबंधीचे तहसीलदार यांच्या समोर रु. १००/- स्टॅम्प पेपरवर केलेले प्रतिज्ञापत्र (Gap certificate) सादर करणे बंधनकारक आहे.

विद्यार्थ्याने प्रवेश घेताना शाळा सोडल्याच्या दाखल्याची मूळ प्रत सादर करणे आवश्यक आहे. व्दितीय प्रतीवर प्रवेश दिला जाणार नाही. काही अपवादात्मक परिस्थितीत व्दितीय प्रत विचारात घेतली जाईल, तथापि त्यासोबत खालील कागदपत्रे जोडणे बंधनकारक आहे.

ब. १. शाळा सोडल्याचा मूळ दाखला हरवल्याबाबत पोलिसात नोंदवलेली तक्रार व त्याबाबतचा तक्रार क्रमांक व अहवालाची प्रत

ब. २. शाळा सोडल्याच्या मूळ दाखल्याचा गैरवापर न केल्याबाबत मा. तहसीलदार यांच्या समोर रु.१००/- स्टॅम्प पेपरवर केलेले प्रतिज्ञापत्र (परिशिष्ट - ५)

उपरोक्त कागदपत्रांशिवाय व्दितीय प्रतीवर प्रवेश अर्ज स्विकारला जाणार नाही व प्रवेश देखील ग्राह्य समजण्यात येणार नाही.

## क. विद्यार्थ्यांना १२ टक्के गुणांचा अधिभार मिळण्यास पात्र प्रमाणपत्र

क.१. तलाठी/पटवारी यांनी सन २०२१-२२ किंवा २०२२-२३ मध्ये दिलेला शेतजमिनीचा ७/१२ चा उतारा/ खासरा (गांव नमुना) उमेदवारांच्या नावावर किंवा त्यांचे आई/वडील किंवा त्यांचे आजी/आजोबा यांच्या नावे असावा. (७/१२ ऑनलाईन प्रत असल्यास स्वसाक्षांकीत असावे)

क.२. यदाकदाचित आई/वडील हयात नसतील तर सदर उतारा त्यांच्या कुटुंब प्रमुखाच्या नावावर असावा व या परिस्थितीत कुटुंब प्रमुखाचे रु.१००/- च्या मुद्रांकावर प्रतिज्ञापत्र असावे. प्रतिज्ञापत्रकामध्ये सदर उमेदवाराचा उक्त जमिनीमध्ये कायदेशीर हक्क असल्याचे नमूद करण्यात यावे.

क.३. सदर उतारा मराठी/हिंदी/इंग्रजी भाषेत नसेल तर संबंधित राज्यातील राजपत्रित अधिकाऱ्याने प्रमाणित केलेले उताऱ्याचे अचूक भाषांतर

क.४. उमेदवाराच्या आईचा तिच्या वडीलांकडील शेतजमिनीत वाटा असल्याबाबतचे रु.१००/- च्या मुद्रांकावर तिच्या वडिलांचे प्रतिज्ञापत्र व ७/१२ उतारा सादर केल्यास असा उमेदवार १२ गुणांचा अधिभार मिळण्यास पात्र राहील.

क.५. उमेदवारास सूचित करण्यात येते की, ७/१२ उताऱ्याच्या आवश्यक तेवढ्याा सत्यप्रती प्रवेशाच्या वेळेस सोबत ठेवाव्यात.

क.६. उमेदवाराच्या जमिनीच्या ७/१२ उताऱ्यामध्ये नोंदविलेल्या नावापेक्षा त्याच्या/तिच्या इयत्ता १०/१२ वी च्या गुणपत्रक व प्रमाणपत्रामध्ये असलेले नाव भिन्न असल्यास, अशा उमेदवाराने त्याबाबतचे प्रतिज्ञापत्रक सादर करणे बंधनकारक राहील.

क.७. मासेमार/नौकाहीन मासेमार असल्याचे प्रमाणपत्र (मत्स्य अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रमासाठी) : उमेदवार मच्छिमार व्यवसाय करणाऱ्या कुटुंबातील असल्यास, मत्स्य व्यवसाय करणाऱ्या कुटुंबासंदर्भात महाराष्ट्र शासनाच्या मत्स्य व्यवसाय विभागाचे सहायक मत्स्य आयुक्तांचा मासेमार दाखला (परिशिष्ट -''४'')

किंवा

भूमीहीन शेतमजूर असल्याबाबतचे प्रमाणपत्र : उमेदवाराचे वडील/पालक भूमीहीन शेतमजूर असल्यास भूमीहीन शेतमजूराचे शेतमजूरी करणे हे उपजिविकेचे साधन असल्याचा उल्लेख प्रमाणपत्रात असणे जरुरीचे आहे. हे प्रमाणपत्र तहसिलदार अथवा नायब तहसिलदार यांचे सही शिक्क्यानिशी असावे. सदर प्रमाणपत्रधारक उमेदवार शेतकरी या प्रवर्गासाठी (AG Category) ठेवण्यात आलेल्या आरक्षणासाठी पात्र ठरणार नाही. सदर प्रमाणपत्राचा नमुना परिशिष्ट ''२'' येथे देण्यात आला आहे.

क.८. शेतकरी असल्याबाबतचे प्रमाणपत्र : सन २०२१-२२ किंवा २०२२-२३ या वर्षातील तहसीलदार अथवा नायब तहसीलदार यांनी दिलेले शेतकरी असल्याबाबतचे प्रमाणपत्र. या प्रमाणपत्रात उमेदवार त्याचे/तिचे आई/वडील अथवा आजी/आजोबा (वडीलांचे आई-वडील) हे जमीनधारक किंवा कूळ असून त्या जमिनीद्वारे मिळणारे उत्पन्न हेच त्या कुटुंबाच्या उपजिविकेचे प्रमुख साधन आहे, असे नमूद केलेले असावे. सदर प्रमाणपत्राचा नमुना परिशिष्ट ''१'' येथे देण्यात आला आहे. अशा प्रमाणपत्र धारकास शेतकरी प्रवर्ग लागू असेल.

**५.९. जातीचे व जातवैधता प्रमाणपत्र व उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे (नॉन क्रिमीलेअर) प्रमाणपत्र उपजिल्हाधिकारी/उपविभागीय/ तहसीलदार/तालुका दंडाधिकारी यांनी विहित नमुन्यामध्ये दिलेले जातीचे प्रमाणपत्र, विमुक्त जाती-अ, भटक्या जमाती-ब, भटक्या जमाती-क, भटक्या जमाती-ड, इतर मागासवर्गीय, एस.ई.बी.सी., इ.डब्ल्यु.एस व विशेष मागास प्रवर्गातील उमेदवारांनी तहसीलदार, तालुका दंडाधिकारी अथवा विशेष कार्यकारी दंडाधिकारी यापेक्षा कमी दर्जा नसलेल्या सक्षम अधिकाऱ्यांनी दिनांक १.४.२०२२ रोजी किंवा अर्ज ज्या दिनांकास दिला असेल त्या दिनांकास ग्राह्य असलेले उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतचे (नॉन क्रिमीलेअर) प्रमाणपत्र**

**५.१०. प्रकल्पग्रस्त असल्याबाबतचा दाखला : महाराष्ट्रातील जिल्हा पुनर्वसन अधिकारी** (District Rehabilitaion/Resettlement Officer) **यांनी उमेदवार/वडील हे प्रकल्पग्रस्त आहेत व त्यांच्या/तिच्या वडिलांची/पालकांची किंवा आजोबांची शेतजमीन महाराष्ट्रातील कृषि विद्यापीठे/पाटबंधारे/वीज/संरक्षण प्रकल्प या विभागासाठी संपादित केलेली/झालेली आहे असे प्रमाणपत्र. अधिकाऱ्याने दिलेले प्रकल्पग्रस्ताचे प्रमाणपत्रावर या सवलतीचा फायदा ज्यांना द्यायचा आहे, त्याच्या नावाचा उल्लेख असणे आवश्यक आहे.**

**५.११. राष्ट्रीय छात्र सेना (एन.सी.सी.) प्रमाणपत्र : हवाईदल / नौदल / स्थल सेना विभागाचे सक्षम अधिकारी यांनी दिलेले प्रमाणपत्र किंवा स्काऊट गाईड तालुका समादेशक/मुख्याध्यापक/प्राचार्य यांनी दिलेले प्रमाणपत्र किंवा महाराष्ट्र छात्र सेना (एम.सी.सी) जिल्हा समादेशक अधिकारी/ मुख्याध्यापक/प्राचार्य/यांनी दिलेले प्रमाणपत्र. (सदरचे प्रमाणपत्र इ. ८ वी ते १० वी या कालावधीतील असावे).**

**५.१२. क्रीडा प्रमाणपत्र : तालुका किंवा जिल्हा पातळीवरील तालुका/जिल्हा क्रीडा अधिकाऱ्यांने निर्गमित केलेले इ. ८ वी ते १० वी या कालावधीतील प्रमाणपत्र ग्राह्य धरण्यात येईल. केवळ मुख्याध्यापकांच्या स्वाक्षरीचे प्रमाणपत्र ग्राह्य धरण्यात येणार नाही. नोंदणीकृत क्रीडा असोसिएशनने प्राधिकृत केलेल्या क्रीडा स्पर्धेच्या प्रमाणपत्रावर तालुका/जिल्हा क्रीडा अधिकारी यांची प्रतिस्वाक्षरी असल्यास अधिभार मिळेल.**

**५.१३. तालुका/जिल्हा स्तरावर सांस्कृतिक नैपुण्य/वादविवाद/नाटक इत्यादी स्पर्धेमध्ये भाग घेतला असल्यास इ. ८ वी ते १० वी या कालावधीतील यासंबंधी शिक्षणाधिकाऱ्याचे प्रमाणपत्र ग्राह्य धरण्यात येईल.**

**५.१४. स्वातंत्र्य सैनिकांसाठी असलेल्या आरक्षण सवलतीचा लाभ स्वातंत्र्य सैनिकांचे मुलगा/मुलगी किंवा मुलाचा/मुलीचा मुलगा/मुलगी यांना खालील अटीच्या अधीन राहून दिला जाईल. उमेदवाराचे आई/वडील किंवा आजी/आजोबा स्वातंत्र्य सैनिक असल्याबाबतचे मा. पंतप्रधान/मा. मुख्यमंत्री यांची सही असेले प्रमाणपत्र प्रवेश अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे. स्वातंत्र्य सैनिक यांनी खालील प्रमाणे रुपये १००/- चे स्टॅम्प पेपरवरील प्रतिज्ञापत्र अर्जासोबत सादर करावे लागेल.**

- **उमेदवार हा स्वातंत्र्य सैनिकाच्या मुलाचा/मुलीचा, मुलगा/मुलगी आहे.**
- **स्वातंत्र्य सैनिकाने ह्या सवतलतीचा उपयोग यापूर्वी कुठल्याही नातेवाईकासाठी केलेला नाही.**
- **स्वातंत्र्य सैनिकाने ह्या सवलतीचा जर आता उपयोग केला तर पुढे करणार नाही.**

**५.१५. आजी/माजी सैनिक असल्याचे प्रमाणपत्र : उमेदवाराचे वडील सैनिक असल्यास संबंधीत सैन्याधिकारी/ जिल्हा सैनिक बोर्डाचे अधिकारी यांचे विहित नमुन्यातील प्रमाणपत्र किंवा** Discharge Certificate. **उमेदवार स्वतः सैनिक असल्यास संबंधित सैन्याधिकारी/जिल्हा सैनिक बोर्डाचे अधिकारी यांचे विहित**

**नमुन्यातील प्रमाणपत्र किंवा** Discharge Certificate. **(टिप: उमेदवार माजी सैनिक असल्यास त्याचे वय ४५ पेक्षा जास्त नसावे.)**

**५.१६. कृषि विद्यापीठे/कृषि परिषदेचे कर्मचारी असल्याचे प्रमाणपत्र : उमेदवाराचे पालक कृषि विद्यापीठे/कृषि परिषदेचे आजी/माजी अथवा मृत सेवक असल्यास संबंधीत कार्यालय प्रमुख किंवा नियंत्रण अधिकाऱ्याचे प्रमाणपत्र.**

**५.१७. अपंग असल्याचे प्रमाणपत्र : अपंग वर्गवारीसाठी उमेदवाराचे ४० टक्के किंवा त्यापेक्षा जास्त अपंगत्व असल्याबाबतचे जिल्हा शल्यचिकित्सक /वैद्यकीय मंडळाचे प्रमाणपत्र. स्वत:ची वैद्यकीय तपासणी केल्याबाबतचा नोंदणीकृत वैद्यकीय अधिकाऱ्याचा दाखला (प्रवेशानंतर सादर केला तरी चालेल).**

**५.१८. अनाथ प्रमाणपत्र : आयुक्त, महिला व बालविकास, पुणे यांच्या छापील लेटर हेडवरील उपायुक्त (बालविकास), पुणे/आयुक्त, महिला व बालविकास, पुणे यांच्या स्वाक्षरीचे प्रमाणपत्र**

**५.१९. प्रवेश अर्जा सोबत सादर करण्यात आलेली कागदपत्रे वाचनीय असावीत. याची खातरजमा करूनच कागदपत्रे जोडावीत. सादर केलेली कागदपत्रे वाचनीय नसल्यास ते ग्राह्य धरण्यात येणार नाहीत व याबाबतची पूर्णत: जबाबदारी उमेदवाराची राहील.**

**५.२०. सर्व दृष्टीने परिपूर्ण भरलेला तसेच प्रवेश वेळापत्रकात दिलेल्या शेवटच्या तारखेपर्यंत विहित वेळेमध्ये सादर करण्यात आलेला अर्ज प्रवेशासाठी ग्राहय धरला जाईल.**

**५.२१. खालील पैकी कोणत्याही एका त्रुटीमुळे प्रवेश अर्जाचा विचार न करता तो रद्द करण्यात येईल.**

**५.२१.१ प्रवेश अर्ज परिपूर्ण भरलेला नसल्यास व प्रवेश अर्जावर उमेदवाराचे पासपोर्ट आकाराचे सध्याचे रंगीत छायाचित्र व स्वत:ची स्वाक्षरी नसल्यास**

**५.२१.२ प्रवेश अर्जा सोबत पात्रता परीक्षेचे गुणपत्रक/प्रमाणपत्राची प्रत जोडली नसल्यास**

**५.२१.३ प्रवेश अर्जा सोबत सादर केलेल्या स्वछायांकीत प्रतींच्या सत्यतेबाबत स्वयंघोषणापत्र नसल्यास**

**५.२१.४ प्रवेश अर्जा सोबत शाळा सोडल्याचा दाखला किंवा बोनाफाईड सर्टिफिकेट** (Bonafied Certificate) **ची प्रत सादर केली नसल्यास**

**५.२१.५ सेवेत असणाऱ्या उमेदवाराने संबंधित नियुक्ती प्राधिकाऱ्याचे 'ना हरकत प्रमाणपत्र' अर्जा सोबत जोडले नसल्यास.**

**५.२१.६ प्रवेश अर्जाचे विहित शुल्क न भरल्यास**

**५.२१. कृषि तंत्र पदविका (२ वर्ष कालावधी) व मत्स्य अभियांत्रिकी पदविका (३ वर्ष कालावधी) अभ्यासक्रमाच्या प्रवेशाच्या वेळी किंवा गुणवत्ता यादी तयार करताना दोन किंवा त्यापेक्षा जास्त उमेदवारांना समसमान गुण असतील तर अशा उमेदवारांचा गुणवत्ताक्रम ठरविण्यासाठी खालील कार्यपध्दतीचा अनुक्रमे अवलंब करण्यात येईल**

**अ) इयत्ता १० वी मधील उच्चतम गुणांची टक्केवारी**

**ब) कमी प्रयत्नात इयत्ता १० वी उत्तीर्ण झालेला उमेदवार**

**क) वयाने मोठा असलेला उमेदवार**

**ड) विद्यालयांत प्रथम सादर केलेला परिपूर्ण प्रवेश अर्ज**

## ६. प्रवेश कार्यपध्दती

६.१. प्राप्त झालेल्या प्रवेश अर्जाची छाननी करुन संबंधित विद्यालय/निकेतनांचे प्राचार्य आरक्षण तक्त्या प्रमाणे तात्पुरती गुणवत्ता यादी तयार करुन संबंधित जिल्ह्याचे प्रवेश प्रक्रिया केंद्राचे केंद्र प्रमुख यांच्यामार्फत मूळ प्रवेश अर्जांची पडताळणी करुन नियोजित वेळापत्रकाप्रमाणे विद्यालयाच्या सूचना फलकावर प्रसिध्द करण्यात येईल. तसेच त्रूटी आलेल्या प्रवेश अर्जाची स्वतंत्र यादी सूचना फलकावर प्रसिध्द करण्यात येईल. अर्जदारांनी सदरची यादी संबंधित विद्यालयात पहावी.

६.२. हरकत निवारण समिती खालील प्रमाणे असेल.

| | |
|---|---|
| मा. सहयोगी अधिष्ठाता, (नि.कृ.शि.) | अध्यक्ष |
| तांत्रिक अधिकारी, (नि.कृ.शि) | सदस्य |
| अधिक्षक/सहा. अधिक्षक (नि.कृ.शि) | सदस्य सचिव |

६.३. तात्पुरती गुणवत्ता यादी तसेच त्रूटी आलेल्या प्रवेश अर्जाची स्वतंत्र यादी सूचना फलकावर प्रसिध्द झाल्यानंतर प्रवेश प्रक्रिया वेळापत्रका प्रमाणे हरकत निवारण कालावधी (Grievence Redressal Period) सुरु होईल. तो सुरु झाल्यानंतर विद्यार्थ्याला अपूर्ण कागदपत्रांची माहिती कळू शकेल.

६.४. अपूर्ण कागदपत्रांची पूर्तता विद्यार्थी हरकत निवारण कालावधीमध्ये संबंधित विद्यालयांच्या प्राचार्यांकडे राहिलेली कागदपत्रे सादर करु शकतो. सदर त्रूटींची पूर्तता झाल्यानंतर विद्यालयाचे प्राचार्य एकत्रित प्रस्ताव मा. सहयोगी अधिष्ठाता (नि.कृ.शि) यांना लेखी ई-मेलव्दारे सादर करतील. सदर कागदपत्रांची छाननी करुन ती योग्य असल्यास प्रवेश अर्ज प्रवेशासाठी ग्राह्य धरण्यात येईल अथवा नाकारण्यात येईल.

६.५. प्रवेश अर्ज सादर केल्यानंतर कोणतीही अतिरिक्त कागदपत्रे विद्यालयांत किंवा कृषि विद्यापीठाकडे स्वीकारली जाणार नाहीत.

६.६. या सर्व प्रक्रियेनंतर अंतिम गुणवत्ता यादी मा. सहयोगी अधिष्ठाता, नि.कृ.शि. यांचे मान्यतेने विद्यालयनिहाय प्रसिध्द करण्यात येईल.

६.७. मत्स्य अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रमासाठीचे अर्ज वगळता. उमेदवारांना प्रवेश हा रहिवाशी जिल्ह्यानुसार दिला जाईल. प्रवेश प्रक्रिया ही संबंधीत विद्यालयांमध्ये राबविण्यात येईल. उमेदवार ज्या जिल्ह्याचा कायम रहिवाशी आहे, तो त्या जिल्ह्यातील विद्यालयात प्रवेशास पात्र राहिल.

६.८. सक्षम प्राधिकाऱ्याचे अधिवास प्रमाणपत्र किंवा महाराष्ट्र राज्यातील जन्म ठिकाणाचा उल्लेख असलेले महाविद्यालय / शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र किंवा महाराष्ट्र राज्यातील सक्षम प्राधिकाऱ्याकडील जन्म दाखला यावरुन उमेदवाराचा रहिवाशी जिल्हा निश्चित केला जाईल.

६.९. मा. सहयोगी अधिष्ठाता (नि.कृ.शि.) यांच्या मंजूरीने प्रत्येक विद्यालयाच्या जिल्हानिहाय व विद्यालयनिहाय गुणवत्ता यादी संबंधित विद्यालयांत सूचना फलकावर प्रसिध्द करण्यात येतील.

६.१०. प्रवेश वाटप यादी प्रसिध्द झाल्यानंतर ज्या विद्यार्थ्यास प्रवेशाचे वाटप झालेले आहे त्या विद्यार्थ्याने संबंधित विद्यालयात मुळ कागदपत्रांसह प्रत्यक्ष उपस्थित राहून प्रवेश कार्यक्रमा प्रमाणे नेमून दिलेल्या कालावधीमध्ये मूळ कागदपत्रे विद्यालयात सादर करुन विहित शुल्क भरुन प्रवेश निश्‍चित करावा.

६.११ विद्यालयांतील सर्व रिक्त जागांचा तपशील प्रवेश प्रक्रियेची फेरी संपल्यानंतर कृषि तंत्र विद्यालय / मत्स्य अभियांत्रिकी विद्यालय यांचे प्राचार्य विद्यापीठाकडे आरक्षण तक्त्यानुसार ई-मेल व्दारे तात्काळ सादर करतील व आपल्या सूचना फलकावर प्रसिध्द करतील. विद्यालयातील जागा पूर्ण भरल्यानंतर उर्वरीत विद्यार्थ्यांना त्यांच्या पसंतीनुसार इतर विद्यालयांतील रिक्त जागेवर प्रवेश देण्यात येईल.

६.१२ पहिल्या फेरी नंतर रिक्त राहिलेल्या जागांसाठी प्रवर्ग बदलून शासकीय नियमानुसार दुसरी फेरी राबविण्यात येईल. (महात्मा गांधी आदिवासी जनता विद्यालय कोसबाडहिल, ठाणे येथे अनुसुचित जमाती या एकाच प्रवर्गातील विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात येत असल्याने पहिल्या फेरीनंतर रिक्त राहिलेल्या जागांसाठी जिल्हा बदलून गुणवत्तेनुसार दुसरी फेरी राबविण्यात येईल.)

६.१३ सर्व प्रवेशफेरीद्वारे दिलेल्या प्रवेशाची कार्यवाही संबंधीत कृषि तंत्र विद्यालय/मत्स्य अभियांत्रिकी विद्यालयातच कार्यक्रमपत्रिके नुसार करण्यात येईल. तिसऱ्या फेरीतील जिल्हा बंदीची अट शिथिल करुन प्राप्त झालेल्या यादीनुसार गुणानुक्रमे प्रवेश यादी प्रसिध्द करुन प्रवेश फेरी राबविण्यात येईल.

६.१४ एखाद्या उमेदवाराला प्रवेश वाटपाबाबत तक्रार करायची असल्यास, संबंधित प्रवेश वाटप फेरीच्या कालावधीतच कृषि विद्यापीठाचे सहयोगी अधिष्ठाता (निकृशि) यांच्याकडे कार्यालयीन ई-मेल adlaedbskkv@rediffmail.com यामेल वर लेखी तक्रार अर्ज दाखल करू शकेल. अशा तक्रारीबाबत तात्काळ शहानिशा करून यथायोग्य कार्यवाही करण्यास कृषि वद्यापीठाचे सहयोगी अधिष्ठाता (निकृशि) हे सक्षम असतील.

## ७. प्रवेश निश्‍चित केल्यानंतर रद्द केल्यास शुल्क परतावा

विद्यार्थ्याने प्रवेशाची नोंदणी केल्यानंतर व वर्ग सुरु होण्यापूर्वी प्रवेश रद्द केल्यास विद्यार्थ्याकडून प्रवेश प्रक्रिया शुल्का पोटी कमाल रु. १०००/- रक्कम कपात करण्यात येईल.

प्रवेशाची नोंदणी केल्यानंतर व वर्ग सुरु झाल्यानंतर विद्यार्थ्याने प्रवेश रद्द केल्या रु.१०००/- + वर्ग सुरु झालेल्या महिन्यापासून ज्या महिन्यामध्ये प्रवेश रद्द केला असेल त्या महिन्यापर्यंत दरमहा होणारे वर्ष/सत्र आधारित शिक्षण शुल्क व दरमहा होणारे वसतिगृह शुल्क (वसतिगृह उपलब्ध करुन दिलेले असल्यास) संबंधित विद्यार्थ्याकडून वसूल करण्यात येईल.

वर्ग सुरु झाल्यानंतर राबविण्यात आलेल्या प्रवेश फेरीद्वारे प्रवेश मिळालेल्या विद्यार्थ्यांनी नोंदणी करुन प्रवेश रद्द केल्यास रु.१०००/- + नोंदणी केलेल्या तारखेच्या महिन्या पासून ज्या महिन्यामध्ये प्रवेश रद्द केला असेल त्या महिन्या पर्यंत दरमहा होणारे वर्ष/सत्र आधारित शिक्षण शुल्क व दरमहा होणारे वसतिगृह शुल्क (वसतिगृह उपलब्ध करुन दिलेले असल्यास) संबंधित विद्यार्थ्याकडून वसूल करण्यात येईल.

## ८. विद्यार्थ्यांची वर्तणूक व शिस्त

विद्यार्थी रॅगिंग, अपहरण आणि इतर गैरशिस्तीच्या प्रकरणात आढळून आल्यास त्यास पूर्वसूचना न देता विद्यालयातून काढून टाकण्यात येईल. तसेच रॅगिगंच्या नियमानुसार त्यांचेवर कार्यवाही होईल. त्यासाठी विद्यार्थ्यांनी www.helpline@antiragging.in साईटवर भेट देऊन रॅगिंगबाबतची संपूर्ण माहिती स्वतः अवगत करुन घ्यावी. प्रत्येक विद्यालयाच्या प्राचार्यांनी प्रत्येक विद्यार्थ्यांचे व त्याच्या पालकाचे त्याचा प्रवेश निश्चित झाल्यावर रॅगिंगबाबतचे प्रतिज्ञापत्र ऑनलाईन पध्दतीने www.antiragging.in किंवा amanmovement.org संकेतस्थळावर भरुन घेणे सक्तीचे आहे.

## ९. शिष्यवृत्ती आणि सवलती

कृषि तंत्र पदविका अभ्यासक्रम, कृषि तंत्रज्ञान पदविका अभ्यासक्रम तसेच मत्स्य अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रम व्यावसायिक म्हणून घोषित झालेले नाहीत. त्यामुळे व्यावसायिक अभ्यासक्रमांना लागू असलेल्या शैक्षणिक सवलती (शैक्षणिक शुल्क प्रतिपूर्ती व शिष्यवृत्ती) सदर अभ्यासक्रमांना अनुज्ञेय नाहीत. शासन मान्य भारत सरकार शिष्यवृत्ती लागू असल्यास तिचा लाभ विद्यार्थ्यांस मिळू शकेल. परंतू विहीत कालावधीमध्ये आवेदनपत्र भरणे ही संबंधित विद्यार्थ्यांची जबाबदारी राहील.

## १०. आरक्षित जागा

महाराष्ट्र कृषि विद्यापीठे अधिनियम १९८३ मधील तरतुदीनुसार या विद्यापीठांतर्गत विद्यालयांमध्ये प्रवेशासाठी आरक्षित ठेवण्यात आलेल्या जागांचा तपशिल पुढील प्रमाणे.

| अ. क्र. | वर्ग | आरक्षित जागांची टक्केवारी |
|---|---|---|
| १ | अनुसूचित जाती व नवबौध्द | १३ |
| २ | अनुसूचित जमाती | ७ |
